FORM-I A

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: ला. प्र. वि., पहिली खबर क्र. FIR No.: 83/18, वर्ष Year: 2018, दिनांक Date: 03/12/18

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलमे Sections: 7
   (ii) अधिनियम Act: (सुधारणा 2018), कलमे Sections ......
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ......

3. (a) अपराधाची घटना: Occurrence of offence: वार Day: शुक्रवार, तारीख पासून Date from: 30/11/18, वेळ Time ......, तारीख पर्यंत Date to: 03/12/18, वेळ Time ......
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S.: तारीख Date: 03/12/2018, वेळ Time: 17.00 वा.
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference: Entry No.: 87/18, तारीख Date: 03/12/2018, वेळ Time: 18.20 वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information: ......, लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence: (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ......, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ......
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: म्हाडा कार्यालय, कलानगर, No. if any ......, वांद्रा, Ward: मुंबई, रस्त्याचे नाव Name of road ......
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place ......, गाव Village ......, पोस्ट Post ......, तालुका Taluka ......, जिल्हा Distt. ......, राज्य State ......
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ......, तालुका Taluka ......, जिल्हा Distt. ......, राज्य State ......

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant: Permanent Address.
   (a) नाव Name: श्रीमती गायत्री ठाकर (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name: श्री. मनिष ठाकर
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age: 39 (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय फोन नं. Phone No.: 7570700324[illegible]
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ...... दिल्याचा दिनांक Date of Issue ...... दिल्याचे ठिकाण Place of Issue ...... (f) व्यवसाय Occupation ......
   (g) धर्म Religion ......, जात Caste ......, जनजाती Sub-Caste ......
   (h) पत्ता Address: रु. नं. 12, गल्ली / वार्ड नं. Ward: 813, घर / नाव नंबर House/Name No.: शिवकॉलनी, फोन / मो. नंबर Phone/M. No.: ओर्ये सेक्शन, पॅन नं. Pan No.: उल्हास नगर, कार्ड नं. Card No.: 4 ठाणे.
   रस्त्याचे नाव Road ...... जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ...... गाव Village ...... पोस्ट Post ...... पो. स्टे. P. Stn. ......
   तालुका Taluka ...... जिल्हा Distt. ...... राज्य State ...... सध्याचा पत्ता Present Address ......

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   (1) आलोसे कोचक चंद्रकांत द्यारकर (वरिष्ठ लिपिक)
   (2) आलोसे विकास दिनानाथ पावसकर (मिळकत व्यवस्थापक)
   दोन्ही नेमणूक मिळकत व्यवस्थापक कार्यालय, कोकण गृहनिर्माण मंडळ, म्हाडा कलानगर, वांद्रा, पूर्व, मुंबई.

अ

Scanned by CamScanner

COMMISSIONER OF POLICE ANTI-CORRUPTION BUREAU MUMBAI सत्यमेव जयते

तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे तात्काळ
Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक :
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख ठिकाणी व वेळी फिर्यादि यांनी विकत घेतलेली म्हाडा मधील सदनिका नावावर करण्याकरिता व गृह कर्जाकरिता लागणारे ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरिता आलोसे कांचन धारकर यांनी कायदेशीर परिरक्षीका खेरीज स्वतःकरिता व मिळकत व्यवस्थापक पावसकर यांचे करिता रु.५५०००/- ची लाचेची मागणी करून तडजोडी अंती रु.५०००/- इतकी लाचेची रक्कम स्विकारली म्हणून दोघांन विरुद्ध कलम ७ भ्र.प्र.अ. कायदा १९८८ (सुधारणा २०१८) अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही :-** 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ..........., जिल्हा ..........., राज्य ...........,
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .................. Rank.................. No. ..............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........................................ (3) Transferred to P.S ........................................,
District ............................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

[signature] [signature] 03/92

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ... अविनाश प्रताप
पदनाम Rank ... पोलीस निरिक्षक,
तपासिक अं. चा कोड. क्र.
Posting
Code No. of I. O. ............................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned by CamScanner

जबाब दि.०३/१२/२०१८

श्रीमती. गायत्री मनिष ठाकरे वय ३१ वर्षे, धंदा — नोकरी, रा.ठी. रूम नं.१२, चाळ बी ३, शिव कॉलनी, ओटी सेक्शन, उल्हास नगर ५, ठाणे. मो.७५०७००३२४९.

———

मी वरीलप्रमाणे असुन वर नमुद पत्यावर माझे लग्नानंतर राहण्यास आहे. सदर ठिकाणी मी माझे पती श्री.मनिष संभाजी ठाकरे, मुलगा कु.अथर्व, सासु श्रीमती. गगुबाई संभाजी ठाकरे यांच्या समवेत राहण्यास आहे. मी मध्यवर्ती रूग्णालय, उल्हास नगर ३, ठाणे येथे अधिपरिचारीका म्हणुन नोकरी करीत आहे. तसेच माझे पती यांचा वडापाव विक्रीचा व्यवसाय असुन आमच्या एकत्रित उत्पन्नातुन आम्ही आमचा उदरनिर्वाह करतो.

मी, घर क्र.६, अंबरनाथ शिव अंबे पाटील नगर, ठाणे ही सदनिका श्री. विमल हराळे यांच्याकडुन नोव्हेंबर २०१८ मध्ये विकत घेतली आहे. सदर सदनिकेचे पहिले मालक श्री. भानुदास गायकवाड यांना सदरची सदनिका ही सन २००९ मध्ये म्हाडाच्या लॉटरी सिस्टीममध्ये मिळाली होती. त्यानंतर सदरची सदनिका ही श्री.भानुदास गायकवाड यांनी श्री. विमल हराळे यांना विकली होती. सदर सदनिका ही मी श्री.विमल हराळे यांच्याकडुन विकत घेतल्यानंतर ती माझे नावावर करण्याकरीता म्हाडा कार्यालय, बांद्रा, मुंबई येथे दि. २९/११/२०१८ रोजी ऑनलाईन अर्ज केला होता. तसेच त्याच दिवशी सदर ऑन लाईन अर्जाची मिळालेली पावती घेवुन म्हाडा कार्यालयातील मिळकत व्यवस्थापक कार्यालय कोकण गृहनिर्माण मंडळ विभाग येथे गेले. सदरठिकाणी असलेल्या श्रीमती.घाटकर मॅडम यांनी माझेकडुन आवश्यक असलेल्या कागदपत्राची मुळ प्रत घेतली व त्यांनतर ऑनलाईन अर्ज केलेल्या पावतीवर मला स्वाक्षरी दिली. सदरवेळी श्रीमती.घाटकर मॅडम यांनी मला सदनिका नावावर करून देण्यासाठी तसेच कर्जासाठी लागणारे ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी माझेकडे पाच हजार रूपयेची मागणी केली होती. त्यावेळी श्रीमती. घाटकर मॅडम यांनी मला सदर कामासाठी मिळकत व्यवस्थापक श्री. पावसकर यांना देखिल पैसे दयावे लागतील असे सांगितले. तसेच सदरवेळी श्रीमती घाटकर मॅडम यांनी मला सदर सदनिका नावावर करण्यासाठी तसेच कर्ज मिळण्यासाठी लागणारे ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी शासनाची भरणा करावयाची एकुण फि ही रू.१०,२००/— एवढी असुन ती चलनाद्वारे बॅंक ऑफ महाराष्ट्र बॅंकेत भरणा करावयाची असल्याचे सांगितले. त्यावेळी श्रीमती. घाटकर मॅडम यांनी मला मागणी केलेले पाच हजार रूपये दिल्याशिवाय पुढील कार्यवाही होणार नसल्याचे सांगितले. त्यावेळी माझेकडे पैसे नसल्याने मी तेथुन निघुन गेले.

आज दि.०३/१२/२०१८ रोजी मी विकत घेतलेली सदनिका नावावर करण्यासाठी तसेच कर्ज मिळण्यासाठी लागणारे ना हरकत प्रमाणपत्र यासाठी म्हाडा कार्यालयात चलन भरण्यासाठी मी माझे पती श्री.मनिष ठाकरे यांच्यासह जाण्याचे ठरविले होते. परंतु श्रीमती. घाटकर मॅडम यांनी यापुर्वीच मागणी केलेले पाच हजार रूपये दिल्याशिवाय पुढील काम होणार नसल्याचे मला सांगितले होते. परंतु माझी श्रीमती.घाटकर मॅडम यांना पैसे देण्याची इच्छा नसल्याने मी आज दि.०३/१२/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालय येथे श्रीमती.घाटकर मॅडम व त्यांचे मिळकत व्यवस्थापक यांच्याविरूध्द लेखी तक्रार केली. मी केलेल्या लेखी तक्रारीवरून पोलीस निरीक्षक श्री.जगताप व सपोआ.विजयकर यांनी दोन पंचाना बोलावुन त्यांचे समक्ष मी दिलेल्या तक्रारीस अनुसरून पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यांनतर माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता दोन शासकीय पंचाना पाचारण केले. पो.नि. जगताप यांनी मी त्यांच्याकडे दिलेला तक्रार अर्ज पंचाना दाखविला. सदरचा अर्ज पंचानी वाचून त्यावर सहया केल्या तसेच पो.नि. जगताप यांनी सही करून सदरचा तक्रार अर्ज पोनि.जगताप यांनी स्वत:च्या ताब्यात घेतला.

Scanned by CamScanner

त्यांनंतर पोनि.जगताप, सापळा पथक व मी, तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करीता आम्ही म्हाडा कार्यालय, कलानगर, बांद्रा पुर्व मुंबई येथे रवाना झालो. म्हाडा कार्यालयात जाण्यापुर्वी माहिम परिसरात शासकिय वाहने थांबविण्यात आली. त्यावेळी पोनि.जगताप यांनी त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर पडताळणीच्या अनुषंगाने चालु केले व सापळा पथकातील महिला अंमलदार श्रीमती.समेळ यांच्यामार्फतीने ते माझे कुर्ताचे आतील बाजुस लावण्यात आले. त्यांनतर शासकिय वाहनाने मला व पंच यांना म्हाडा कार्यालयाचे जवळच्या परिसरात सोडण्यात आले. त्यानंतर मी श्रीमती. घाटकर मॅडम यांची भेट घेण्याकरीता त्यांच्या कार्यालयात गेली त्यावेळी मी त्यांच्याकडे माझे कामाच्या संदर्भात चर्चा केली. त्यावेळी श्रीमती.घाटकर मॅडम यांनी मला " तुला सांगितलेल ना आधि ते पैसे आणलेस का ? " त्यावेळी मी त्यांना माझे काम झाले का ? तर मी देते. असे सांगितले. त्यावेळी श्रीमती. घाटकर मॅडम यांनी मला माझे कामाची फाईल बाहेर काढुन मला आधी पैसे देण्याबाबत सांगितले. त्यावेळी श्रीमती.घाटकर मॅडम यांनी मला आधीचे पाचशे ( यापुर्वी श्री.विमल हराळे यांच्याकडुन मी सदनिका विकत घेतली त्यावेळी सदरची सदनिका विकण्यासाठी लागणारे ना हरकत प्रमाणपत्राचे पैसे ) आणि आताचे पाच हजार असे एकुण साडेपाच हजार मागितले. त्यावेळी मी त्यांना पैसे आणते असे सांगुन तेथुन निघुन सापळा पथक थांबले होते त्याठिकाणी येवुन पोहचले. सदर ठिकाणी पो.नि. जगताप व पंचानी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण पोलीस वाहनामध्ये ऐकले असता, लोकसेवकांने लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यांनतर पोनि.जगताप यांच्या सुचनेप्रमाणे सापळा कारवाईचे आयोजन करून मला पुन्हा व्हॉईस रेकॉर्डर लावुन लाचेच्या रक्कमेसह लोकसेवकास भेटण्यासाठी पाठविण्यात आले. श्रीमती. घाटकर मॅडम यांच्या कार्यालयात गेल्यांनतर त्यांनी मला पैसे आणले का ? अशी विचारणा करून त्यांनी त्यांच्या समोर असलेल्या ड्राव्हरकडे हात निर्देशित करून त्यामध्ये पैसे ठेवण्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे मी ड्राव्हरमध्ये पैसे ठेवले व तेथुन निघुन श्रीमती.घाटकर मॅडम यांनी पैसे स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. त्यांनतर सापळा पथकाने लोकसेवक श्रीमती. घाटकर व लोकसेवक श्री.पावसकर यांना रंगेहाथ पकडले.

तरी मी विकत घेतलेली सदनिका ही माझे नावावर करण्यासाठी तसेच गृहकर्ज मिळण्यासाठी लागणारे ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी म्हाडा कार्यालयात अर्ज केला होता. त्यास अनुसरून लोकसेवक श्रीमती.कांचन घाटकर यांनी स्वत:साठी व मिळकत व्यवस्थापक श्री.पावसकर यांच्यासाठी रु.५,५००/— लाचेची मागणी केली. श्रीमती.घाटकर यांनी रू. ५०००/— लाच स्विकारली म्हणुन माझी श्रीमती.कांचन घाटकर, वरिष्ठ लिपीक व श्री. विकास पावसकर, मिळकत व्यवस्थापक, म्हाडा, मुंबई यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई करण्याची विनंती आहे.

माझा वरील जबाब संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असून तो मी वाचून पाहिला असता, तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष

( अविनाश जगताप )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

(सौ. गायत्री मनिष ठाकरे)

Scanned by CamScanner